**वाचा** :- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.रा.भु.अ.आ.का-४/युनिकोड रुपांतरण /प्र.क्र.१५ /२०१२ दिनांक.१५/०३/२०१३

---

क्र./रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र. १५/
डाटा व्हॅलिडेशन /२०१३
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख( महाराष्ट्र राज्य ),पुणे
यांचे कार्यालय ,पुणे.
दिनांक - ३१ /०१/२०१४

# परिपत्रक

**विषय :- राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकिकरण कार्यक्रम तथा ई-महाभूमी डाटा व्हॅलिडेशन विहीत परिमानानुसार केलेल्या तपासणी कामाच्या नोंदी गाव निहाय व गट नंबर/ सर्व्हे नंबर निहाय ठेवणेबाबत.**

ई-महाभूमि तथा राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकिकरण कार्यक्रमा अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक संचालक भुमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य),पुणे या कार्यालयाने राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांचेमार्फत गाव पातळीवरील दप्तराचे संगणकीकरण व फेरफार प्रक्रीया ऑनलाईन करणेसाठी अनुक्रमे ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलीं विकसीत केलेल्या आहेत. या आज्ञावलींची अंमलबजावणी संपुर्ण महाराष्ट्र राज्यात करावयाची आहे. त्यापुर्वी करावयाचे कार्यवाहीबाबत वरील वाचा सदरील परिपत्रकाव्दारे सविस्तर सुचना देणेत आल्या आहेत.सदर परिपत्रकातील मुद्या क्र. ४ मध्ये संगणकीकृत ७/१२ डाटा तपासणी (व्हेरीफीकेशन व व्हॅलीडेशन ) करणेच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार सर्व तलाठी यांनी व्हेरीफीकेशन व व्हॅलीडेशन झालेनंतर संगणकीकृत ७/१२ च्या प्रिंट घेऊन मुळ ७/१२ शी पडताळणी करावी. तपासणीमध्ये संगणकीकृत ७/१२ मुळ हस्तलिखीत ७/१२ शी तंतोतंत मेळात आढळल्यास तसा शेरा संगणीकीकृत ७/१२ च्या प्रिंटवर नमुद करुन संबंधीत तलाठी यांनी नाव नमुद करुन दिनांकीत स्वाक्षरी करावी. तपासणीत चुका आढळल्यास प्रिंटमधील मजकुरास गोल करुन दुरुस्त मजकूर लाल शाईने नमुद करावा.या बदलानुसार पुन्हा संगणकीकृत डेटामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त ७/१२ ची पिंन्ट घेवून सर्व दुरुस्त्या झाल्या असलेची खात्री करावी व तंतोतंत जुळलेबाबत नमूद करुन नाव व दिनांकीत स्वाक्षरी करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

तलाठी यांनी केलेल्या १०० % टक्के तपासणी नंतर अन्य अधिका-यांनी तपासणी करावयाचे परीमाण खालील प्रमाणे ठरविणेत आले आहे.

| अ.क्र. | तपासणी अधिका-यांचे पदनाम | विहित टक्केवारी |
|---|---|---|
| १ | मंडल अधिकारी | ३० % |
| २ | नायब तहसिलदार | १० % |
| ३ | तहसिलदार | ५ % |
| ४ | उपविभागीय अधिकारी | ३ % |
| ५ | जिल्हाधिकारी | १ % |

तपासणी करणा-या अधिका-यांनी स्वत: तपासणी करावयाची असून ती जबाबदारी अन्य अधिका-यांवर सोपवू नये. तसेच नायब तहसिलदार ,तहसिलदार,उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी तपासणी करताना अधिनस्त अधिकारी यांनी तपासणी केलेले गट नंबर/सर्व्हे नंबर वगळून अन्य ७/१२ ची तपासणी करावयाची आहे.

कोणत्या अधिका-याने कोणत्या नंबरच्या ७/१२ ची तपासणी केली यासाठी स्वतंत्र तपासणी नोंदवही खालील नमुन्यात संधारण करावी.

**प्रपत्र**

**युनिकोड रुपांतरीत व्हेरिफीकेशन व व्हॅलीडेशन केलेल्या ७/१२ प्रिन्टआऊट तपासणीची नोंदवही**

| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | गावातील एकूण स.नं./गट नं.संख्या | तपासणी अधिका-यांचे नाव पदनाम | विहीत परिमाण नुसारतपासणी करावयाच्या स.नं./ गट नं.संख्या व टक्केवारी | तपासणी केलेले स.नं./गट नं.संख्या व क्रमाक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

तपासणी अंती सदर नोंदवही अदयावत करुन नोंदवहीमध्ये स्वाक्षरी करुन वाचा सदरील दिनांक १५/३/२०१३ चे परिपत्रकातील सूचनांप्रमाणे प्रपत्र क्र.१ च्या नमून्यात तपासणी प्रमाणपत्र इकडील कार्यालयास सादर करावे व त्याच्या प्रती संबंधित गावाचे दप्तरात अभिलेखासाठी ठेवाव्यात.

( चंद्रकांत दळवी )
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : अप्पर मुख्य सचिव महसुल, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

D:\रा.भु.अ.आ.का\परिपत्रक\संख्यांकी माहीती-.odt२

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : राज्य सुचना विज्ञान अधिकारी, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण, भूमापन,नागरी भूमापन, एकत्रीकरण, रा.भु.अ.आ.का)पुणे यांना माहिती साठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.